# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## शुक्रवार, दिनांक १३ जुलै, २०१२

## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे-**

(अ) तारांकित प्रश्न.

(ब) अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक ४०१ ते ४१५ सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**दोन : विशेषाधिकार भंगाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स.नियम २७३ अन्वये).**

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स.नियम ९७ अन्वये).**

**चार : औचित्याचे मुद्दे - (असल्यास).**

**पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(१)** **सर्वश्री विजय वडेट्टीवार,** दिपक आत्राम, डॉ.कल्याण काळे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्यातील होमिओपॅथिक डॉक्टर रुग्णहिताकरिता आरोग्य सेवा पुरवित असतानाही कायद्यातील काही विसंगत तरतुदींमुळे त्यांना कायदेशीर समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जून, २०१२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, उक्त डॉक्टर खेडोपाडी व दुर्गम भागामध्ये ऊन पावसाची पर्वा न करता रात्री-अपरात्री रुग्णांचे जीव वाचविण्याकरिता कार्य करीत असणे, होमिओपॅथिक डॉक्टरांना ॲलोपॅथीची परवानगी देण्याचे सर्व निर्णय शासन व विधीमंडळ घेऊ शकत असूनही याबाबत उचित कार्यवाही करण्यात येत नसणे, अत: होमिओपॅथिक डॉक्टरांपुढे रुग्णांना सेवा देण्याबाबत प्रश्न निर्माण होणे, परिणामी शासनाने याबाबत त्वरित चौकशी करुन करावयाची आवश्यक ती कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(२)** **सर्वश्री गणपतराव देशमुख,** विवेक पाटील, धैर्यशिल पाटील, श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **गृह मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"सोलापूर शहरातील शांतताप्रिय व अजातशत्रू असलेले प्रतिष्ठीत नागरिक व श्री.सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष तसेच दैनिक संचारचे संपादक श्री.धर्मराज आण्णाराज काडादी हे शनिवार, दिनांक ३० जून, २०१२ रोजी कारखान्याचे कामकाज आटोपून घरी परतत असताना त्यांच्या गाडीवर हत्तूरेवस्ती, कुमठे गावाच्या फाट्याजवळ सोलापूर येथे सायं. ७.४५ वा. गोळीबार झाला व त्यांना फोनवरुन अज्ञात इसमाने वारंवार धमक्या दिल्या, त्यामुळे सोलापूर शहरातील नागरिकांमध्ये पसरलेले चिंतेचे वातावरण, या प्रकरणी नागरिक व सर्व पक्षीय नेतेमंडळानी जाहिर सभा घेवून सदर प्रकरणाची पूर्णपणे सखोल व नि:पक्षपातीपणे चौकशीची मागणी करणे, तसेच दोषी असलेल्या व्यक्तींवर कठोर कारवाईची मागणी करणे, त्याबाबत शासनाने आतापर्यंत केलेली वा करण्यात येत असलेली कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री.विजय औटी,** वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्याचे भूतपूर्व मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे हे जन्मशताब्दी वर्ष असणे, राज्यातील ग्रामीण व इतर जिल्हा मार्ग तसेच ५०० लोकसंख्येपर्यंतच्या गावांना जोडण्यासाठी प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेमार्फत अनेक रस्त्यांचे मजबुतीकरण, डांबरीकरण होऊनही हजारो किलोमीटर्सचे रस्ते अत्यंत दर्जाहीन अवस्थेत असणे, या रस्त्याने होणाऱ्या वाहतुकीस येणाऱ्या अडथळ्यांची शासनास कल्पना असणे, त्या अनुषंगाने अर्थसंकल्पीय अधिवेशन २०१२ मध्ये शासनाने यशवंतराव चव्हाण ग्रामसडक योजना जन्मशताब्दी वर्षात सुरु करण्याची घोषणा करणे, प्रत्यक्षात पावसाळी अधिवेशन २०१२ सुरु होऊनही यासंबंधीचा शासन आदेश न मिळणे, पुरवणी मागण्यांमध्ये या मागणीचा समावेश न होणे, परिणामी ग्रामीण भागातील अनेक समस्यांबाबत निधी उपलब्ध होऊल या आशेवर असलेल्या राज्यातील लोकांची निराशा होणे, परिणामी लोकांमध्ये उमटलेल्या तीव्र प्रतिक्रिया, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची भूमिका."

**सहा : शासकीय विधेयक :-**

सन २०१२ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५ - महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन व विकास) विधेयक, २०१२ यावरील दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.

**( दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत- मध्यंतर )**

**सात : सर्वश्री एकनाथराव खडसे (पाटील),** सुभाष देसाई, बाळा नांदगांवकर, गणपतराव देशमुख, सुधीर मुनगंटीवार, गिरीष बापट, गिरीष महाजन, रविंद्र वायकर, देवेंद्र फडणवीस, श्रीमती मिनाक्षी पाटील, सर्वश्री नितीन सरदेसाई, विनोद घोसाळकर, प्रविण दरेकर, प्रकाश शेंडगे, सुरेश हाळवणकर वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव (मंत्र्यांचे उत्तर) :-

"कोल्हापूर जिल्ह्यातील बेलवळे खुर्द, ता.कागल येथे मागील १० वर्षापासून असलेल्या राजकीय वैमनस्याचे पर्यावसन गोळीबारात होऊन त्यात २ ठार व १७ जण जखमी झाल्याची दिनांक १ जुलै, २०१२ रोजी घडलेली घटना, पुण्यातील येरवडा कारागृहातील अतिरेक्याची कैद्यांनी केलेली हत्या, मुंबईत झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील नवी दिल्ली येथे पकडलेल्या अबु जुंदाल या आरोपीच्या केलेल्या चौकशीत मुंबईतील आमदार निवासामध्ये त्याने वास्तव्य केले असल्याचे, तसेच, नाशिकची पोलीस अकादमीदेखील उडवण्याचा कट रचल्याचे उघड होणे, बऱ्याच गुन्ह्याच्या व भ्रष्टाचाराच्या प्रकरणात संबंधित आरोपींवर न्यायालयाच्या आदेशानंतरच कारवाई होत असल्याचे व पोलीसांवरील अविश्वासामुळेच नागरीक कोर्टात येत असल्याबाबत उच्च न्यायालयाने पोलीस यंत्रणेवर घेतलेले आक्षेप, राष्ट्रीय गुन्हे अभिलेख केंद्र (NCRB) यांच्या अहवालात राज्यात गुन्ह्यातील आरोपींना शिक्षा होण्याचे प्रमाण इतर राज्यांच्या तुलनेत सर्वात कमी म्हणजे ८.२% इतके असल्याचे जाहीर करण्यात येणे, खंडणीसाठी अपहरण करुन हत्या करण्याच्या प्रकरणात झालेली वाढ, इगतपुरी येथून बेपत्ता झालेल्या लैला खान व तिच्या कुटुंबियांच्या हत्येबाबत आणि सिने व्यावसायिक टिक्कू अपहरण प्रकरणात पोलिसांची असलेली संशयास्पद भूमिका, डान्स बारवर बंदी घालूनही डान्सबार सर्रासपणे सुरु असणे, तसेच, सट्टा, जुगार, चोऱ्या, दरोडे, अल्पवयीन मुली व महिलांवरील बलात्कार, बोगस नोटांचा सुळसुळाट, वरिष्ठ नागरीकांची हत्या, तसेच बांधकाम व्यावसायिकांमार्फत होत असलेल्या फसवणुकीच्या घटना आणि वाहने जाळण्याच्या घटना, या सगळ्या प्रकरणांमध्ये दिवसेंदिवस होत

असलेली वाढ, १२ हजार आरोपी फरार असल्याचे नुकतेच उघडकीस येणे, वरिष्ठ अधिकारी व सत्ताधारी नेते यांच्या विरोधात दखलपात्र गुन्हे दाखल करण्यात पोलीस दाखवत असलेली उदासीनता, अनेक प्रकरणात न्यायदंडाधिकारी यांनी दखल घेऊन गुन्हे दाखल करण्याचे आदेश देणे, राजकीय हस्तक्षेपामुळे आरोपींवर कारवाई करण्यास होत असलेला विलंब, वाढत्या नक्षलवादी कारवाया रोखण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची आवश्यकता, त्यामुळे राज्यातील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे ढासळली असून सर्वसामान्य नागरीकांच्या सुरक्षेच्या निर्माण झालेल्या गंभीर प्रश्नाबाबत शासनाची असलेली उदासीन भूमिका, त्यामुळे शासनाने जनतेची विश्वासार्हता गमावली असून जनतेमध्ये शासनाबद्दल निर्माण झालेला तीव्र असंतोष व त्याबद्दल शासनाने करावयाची कार्यवाही."

**अशासकीय कामकाज**

**(बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)**

**आठ : अशासकीय विधेयके :-**

**विचारार्थ :-**

(१) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ३१- महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक, २००९ - श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.

(२) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ४५- महाराष्ट्र खनिज विकास (निर्मिती व उपयोजन) निधी (सुधारणा) विधेयक, २००९ - श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे.

(३) सन २०११ चे वि.स.वि. क्रमांक ६२ - महाराष्ट्र सहाय्यक प्रजनन तंत्रज्ञान (नियमन) विधेयक, २०११ सर्वश्री देवेंद्र फडणवीस, एकनाथराव खडसे (पाटील), वि.स.स. यांचे.

(४) सन २०११ चे वि.स.वि. क्रमांक ६५ - महाराष्ट्र लोकायुक्त आणि उप-लोकायुक्त (सुधारणा) विधेयक, २०११- श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचे.

(५) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक ८४ - हिंदू विवाह (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक , २०१० - श्री. शिशिर शिंदे, वि.स.स. यांचे

(६) सन २०१२ चे वि.स.वि. क्रमांक १६ - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, २०१२ - श्री.मंगेश सांगळे, वि.स.स. यांचे

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १२ जुलै, २०१२.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.